१९६० साली चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्याचा भुभाग महाराष्ट्र राज्यात समाविष्ट करण्यात आला. हे जिल्हे आपल्या सोबत निस्तार हक्काची व्यवस्था घेऊन आले. मध्य प्रांतातून आलेले चंद्रपूर, भंडारा, नागपूर व वर्धा हे जिल्हे सोडले तर उर्वरीत महाराष्ट्रात निस्तार हक्काची कायदेशीर व्यवस्था नव्हती. राज्य सरकारने त्या संबंधात एक समिती नेमली. त्या समितीने स्पष्ट सांगितले की लोक या हक्का बाबत अतिशय संवेदनाशील आहेत. ते नष्ट केले तर त्यांच्यातील असंतोष पेटून उठेल. त्यामुळे पुढे "महाराष्ट्र भू-राजस्व संहिता १९६६" हा कायदा करतांना कलम १६० ते १६७ या तरतुदी वरुन निस्तार हक्काची कायदेशीर व्यवस्था लावणे शासनाला भाग पडले. त्यातील कलम १६१ मधे स्पष्ट म्हटले आहे की जिल्हाधिकारी यांनी निस्तार पत्रकासोबतच त्याकरीता आवश्यक व्यवस्थापनाची योजनाही तयार करावी. पण अशी सुयोग्य योजना कधीच तयार करण्यात आली नाही. निस्तार पत्रकात केलेल्या हक्क नोंदी कागदातच राहिल्या. लोकांमधे बेजबाबदारीची प्रवृत्ती वाढली भ्रष्टाचार बोकाळला.

जैवविविधता संरक्षण व संवर्धनासाठी लोकसहभाग आवश्यक –

आज हे सर्वमान्य आहे की लोक सहभागाशिवाय जैवविविधता संरक्षण व संवर्धनाचे काम अशक्य आहे. असा लोकसहभाग गावपातळीवर ग्रामसभे मार्फतच शक्य आहे. निस्तार हक्काच्या सुयोग्य योजनेच्या माध्यमातून हे साध्य करता येऊ शकेल. त्यासाठी खालील प्रमाणे निती व कृती कार्यक्रम सुचविण्यात येत आहे.

निस्तार हक्काची निती –

१) प्रत्येकाला जगण्याचा हक्क आहे म्हणजेच जगण्यासाठी आवश्यक त्या वस्तू आपल्या गाव परिसरातून घेण्याचा हक्क आहे. तसेच हे निस्तार हक्क कायम स्वरुपी सर्वांना उपभोगता यावेत या करीता आपल्या गाव परिसरातील नैसर्गिक संसाधनाचे सुयोग्य व्यवस्थापन करण्याचे कर्तव्य सुद्धा आहे.

२) गावातील प्रत्येकाच्या अन्न, जळण, चारा, खत, रोजगार, पाणी, शेती करीता आवश्यक असणारे औजारे, घरासाठी लागणारे लहान ईमारती, लाकुड इ. च्या गरजा पूर्ण होतील अशी सुयोग्य व्यवस्थापनाची रित शोधुन त्याची अंमलबजावणी करणे.

३) वनात व वनाजवळ राहणाऱ्या लोकांचे त्या वनातून जिवनावश्यक वस्तू प्राप्त करणाच्या अधिकार हा प्राथमिक आहे. हे मान्य करुन तो अंमलात येईल अशी व्यवस्था बनविणे.

कृती कार्यक्रम

१) ज्या गावपरीसरात ३३% पेक्षा जास्त वनभूमी आहे. तिथे वन मग ते आरक्षित असो की संरक्षित, भारतीय वन अधिनियम १९२७ च्या कलक २८ प्रमाणे "ग्रामवन" घोषित गावसमाजाच्या ताब्यात द्यावा. लोकसहभागाने अशा ग्राम वनांकरीता सुयोग्य नियम बनविण्याचे काम त्वरीत करण्यात यावे.

२) जिथे ३३% पेक्षा कमी वन भूमी असेल तिथे "महाराष्ट्र शासनाच्या ग्रामीण सहभागातून वन व्यवस्थापन " हा कार्यक्रम राबवावा. चांगल्या वनातही हा कार्यक्रम राबवून १००% लाभ गाव-समाजाला उपलब्ध करुन द्यावा.

३) प्रती माणुस व जनावर किती निस्तार आवश्यक आहे याचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करुन निकष तयार करण्याकरीता कामात स्वयंसेवी संस्थांना सहभागी करुन द्यावे.



जीवन वाचवा

१९९२ साली— झालेल्या

आरक्षित वन नोटिफिकेशनमुळे

गावांच्या

निस्तार वर्गिकरणात

झालेला बदल

ता. धानोरा , जि. गडचिरोली
मधील
अकरा गावांचा नमुना अभ्यास

अभ्यासक

वृक्षमित्र

टंडन वाडा , गांधी चौक ,
चंद्रपूर - ४४२ ४०२
फोन नं . : ०७१७२ - ५८१३४
E – mail : vriksha@nagpur.dot.net.in

1992 साली झालेल्या
चुकीच्या वन बंदोबस्तामुळे
गडचिरोली जिल्हयातील निस्तार संकटात

- मोहन हिराबाई हिरालाल
सदस्य, निस्तार समिती

1 समितीलाही माहिती मिळू शकली नाही

चुकीचे निकष वापरुन झालेल्या वनबंदोबस्ता मध्ये गडचिरोली जिल्हयातील वन जमिनीवर असलेले गावांचे निस्तार हक्क मोठ्या प्रमाणावर कमी करण्यात आले. निस्तार धोरणाचा आढावा घेतांना 1992 साली घडलेल्या या घटनेचे दुरगामी परिणाम काय झाले व पुढे होतील याचा आढावा घेणे अतिशय आवश्यक आहे. तो घेण्याकरीताच शासकीय कागदपत्रातील गाववार माहिती निस्तार समिती तर्फे मागविण्यात आली होती. परंतु अतिशय खेदाची गोष्ट आहे की ही माहिती समितीला अजुनही प्राप्त होऊ शकलेली नाही.

2 शिता वरुन भाताची परिक्षा

जी माहिती शासनाने नियुक्त केलेल्या समितीलाही मिळू शकली नाही ती एका अशासकीय सदस्याने मिळविण्यास किती अडचणी आल्या असतील याची कल्पनाच केलेली बरी. आम्ही गडचिरोली जिल्हयातील धानोरा तालुक्यामधिल अकरा गावांची माहिती मिळवली. या माहितीचे विश्लेषण केल्यानंतर समोर आलेले चित्र अतिशय धक्कादायक व पुढे येणा-या संकटाची सूचना देणारे आहे.

2.1 अभ्यास नमुना -

1955 मध्ये झालेल्या निस्तार चौकशीच्या अहवालाप्रमाणे आताच्या गडचिरोली जिल्हयातील 379 (तिनशे ऐकोणऐंशी) गावात ती अनसर्व्हेड असल्याने निस्तार चौकशी झाली नव्हती. त्यामुळे या गावांची निस्तार पत्रकेही तयार करण्यात आली नव्हती. ज्या गावांची चौकशी होऊन निस्तारपत्रके तयार करण्यात आलीत. त्यांची वर्गवारी तीन गटात करण्यात आली. - 1) सरप्लस 2) सेल्फसफिशिएंट व 3) डेफिशीट. गडचिरोली जिल्हयातील गावांची वर्गवारी प्रमाणे गटवार संख्या खालीलप्रमाणे आहे.

1955	सरप्लस	सेल्फ सफिशिएंट	डेफिशीट
(अ) जळतन व टिम्बरच्या दृष्टीने	1086 (78.29%)	37 (2.66%)	264 (19.03%)
(ब) चराईच्या दृष्टीने	1036 (74.69%)	28 (2.01%)	323 (23.28%)

अभ्यास नमुना जास्तित जास्त प्रातिनिधीक रहावा म्हणून आम्ही प्रयत्न केला. निवडलेल्या अकरा गावांमध्ये हे प्रमाण खालीलप्रमाणे आहे.

अभ्यास नमुना गावे	सरप्लस	सेल्फ सफिशिएंट	डेफिशीट
(अ) जळतनच्या दृष्टीने	7 (63.63%)	1 (9.1%)	3 (27.27%)

2.3 **अभ्यासाची मर्यादा -**

हा अभ्यास खरे तर निस्ताराशी संबंधीत सर्व बाबींकरीता होणे आवश्यक होता. उदा. चराई, जळतण, घर व शेतऔजारे यांच्या करीता लागणारे स्मॉल टिम्बर, अन्न, पाणी व कारागीरांसाठी लागणारा कच्चा माल इत्यादी सर्व बाबी विचारात घेऊन असा अभ्यास करायला हवा. परंतु वन अधिका-यांच्या उपसमिती कडून फक्त जळतण संबंधीचेच गरज व उत्पादकता हे आकडे उपलब्ध झाल्याने त्या मयदितच हा अभ्यास करण्यात आला आहे याची कृपया नोंद घ्यावी.

2.4 **अभ्यासात वापरण्यात आलेले आकडे व त्यांचे स्त्रोत -**

अ.क्र.	तपशिल	स्त्रोत
2.4.1	प्रती व्यक्ती/वर्ष जळतणाची गरज - 0.27 मे.टन	अहवाल - निस्तार उपसमितीचा
2.4.2	प्रती हेक्टर/वर्ष जळतणाची वनातून उत्पादकता	- 0.2 मे.टन
2.4.3	निस्तार हक्क असलेले वनक्षेत्र 1955	गावाचे निस्तार पत्रक (रेव्हेन्यू रेकॉर्ड)
2.4.4	निस्तार हक्क कमी केलेले वनक्षेत्र 1992	महाराष्ट्र शासन राजपत्र दि. मार्च 11, 1993 भाग चार-अ
2.4.5.	निस्तार हक्क असलेले वनक्षेत्र 1992	(2.4.3) - (2.4.4)
2.4.6	लोकसंख्या 1955 व 1992	जनगणना अहवाल 1951 व 1991 आधारे अंदाज

2.5 **अभ्यास व विश्लेषण -**

अभ्यासाच्या पहिल्या टप्यात आम्ही 1992 साली झालेल्या वन बंदोबस्तामुळे निस्तार हक्क असलेल्या वनांच्या स्थितीत काय फरक पडला हे बघण्याचा प्रयत्न केला, व दुस-या टप्यात त्या बदलाचा 1992 मधिल जळतणाच्या गरजेच्या संदर्भात विचार करुन काय चित्र दिसते व त्यामुळे त्या गावांच्या वर्गवारीत काही बदल झाला काय हे बघण्याचा प्रयत्न केला. त्यातून जी माहिती समोर आली ती पुढीलप्रमाणे -

2.5.1 **निस्तार हक्कासह वनक्षेत्र - 1955 व 1992**

कृपया चार्ट-1 बघा

* खरकाडी गावाचे वनक्षेत्र कमीही झाले नाही व वाढलेही नाही.

* उरलेल्या नऊ गावातील निस्तार हक्क 1955 च्या तुलनेत 1992 मध्ये वन बंदोबस्त करुन ज्या प्रमाणात कमी करण्यात आले त्यांची गाववार माहिती अशी - पांढरसडा (62.59%), लेखा (57.88%), राजोली (66.87%), परसवाडी (83.25%) मरकेगांव (75.68%) येरंडी (85.02%) हिरंगे (91.67%) काकडयेली (36.33%), जापी (76.14%) मेंढा (लेखा) (91.62%) गावाच्या नावापुढे कंसात लिहलेले आकडे निस्तार हक्क नष्ट केलेल्या वनक्षेत्राचे आहेत.

2.5.2 वन उपलब्ध, जळतणासाठी आवश्यकता व 1992 साली निस्तारासाठी ठेवलेले वनक्षेत्र

* कृपया चार्ट-2 बघा

* 1955 साली काकडयेली सरप्लस होते ते 1992 मध्ये सेल्फ सफिशिएंट मध्ये रुपांतरीत झाले आहे.

* मेंढा (लेखा), जापी, हिरंगे, एरंडी, मरकेगाव, परसवाडी सरप्लस होते ते 1992 मध्ये डेफिसीट झाले आहेत. पुरेसे वन क्षेत्र उपलब्ध नाही म्हणून असे झालेले नाही. निस्तार विषयक चुकीचे निकष वापरुन केलेल्या वनबंदोबस्तामुळेच हे झालेले आहे.

* पांढरसडा 1955 साली सेल्फ सफिशिएंट होते ते 1992 मध्ये डेफिसीट झाले आहे. या गाव हद्दीत संपूर्ण गरज पूर्ण करेल इतके वन क्षेत्र नसले तरी सुमारे 80 हेक्टर वनक्षेत्र अजुनही उपलब्ध आहे, ज्यावर निस्तार हक्क दिल्यास निस्तारचा तुटवडा थोडातरी कमी करता येणे शक्य आहे.

* राजोली, लेखा आणि खरकाडी ही गावे 1955 मध्येही डेफिसीट होती. 1992 मध्ये ही गावे सुपर डेफिसीट झाली आहेत. सुयोग्य निस्तार व्यवस्थे अभावी ही गावे - लागून असलेल्या शासकीय वनातूनच आपली गरज बेकायदेशिररित्या पूर्ण करीत असणार. अर्थातच त्याचा विपरीत परिणाम तेथिल वन व्यवस्थापनावर होणारच.

2.5.3 1992 साली झालेल्या चुकीच्या वन बंदोबस्तामुळे गावांच्या निस्तार वर्गवारीत खालीलप्रमाणे बदल झालेला आहे. कृपया चार्ट-3 पहा.

वर्ष	सरप्लस	सेल्फ सफिशिएंट	डेफिसीट	एकूण
1955	7 (63.63%)	1 (9.1%)	3 (27.27%)	11 (100%)
1992	1 (9.1%)	0 (0%)	10 (90.90%)	11 (100%)

* डेफिसीट गावांमध्ये 63.63% वाढ ही निस्तार संबंधात एक अतिशय गंभीर दखल घेण्याजोगी बाब होय.

2.5.4 कारणांचा शोध -

* लोकसंख्या वाढ - हे कारण खरे असले तरी ते सर्व गावांच्या बाबतीत खरे नाही. ।। पैकी 3 गावे आधीच डेफिसीट होती. उरलेल्या पैकी फक्त एकच गाव जे सेल्फ सफिशिएंट होते ते लोकसंख्या वाढीच्या कारणाने डेफिसीट झाले आहे.

* वन बंदोबस्त करतांना वापरलेले चुकीचे निकष - वाढलेल्या लोकसंख्येची गरज पुर्ण करु शकेल इतके वनक्षेत्र गाव परिसरात उपलब्ध असतांनाही फक्त चुकिचे निकष वापरुन केलेल्या वनबंदोबस्तामुळेच 6 सरप्लस गावे डेफिसीट झाली आहेत हे या अभ्यासाने सिध्द झाले आहे.

* भारतीय वन अधिनियम 1927 मधिल कलम 4 व कलम 6 मधिल तरतुदींची सुयोग्य काटेकोर अंमलबजावणी न करणे -

अ) चुकिचे निकष वापरुन होत असलेली, निस्तार धोरणावर दुरगामी विपरीत परिणाम करणारी कार्यवाही ज्यांचे जीवन या निस्तारावर अवलंबून आहे असे लोक थांबवू शकले असते, पण कलम 4 व 6 प्रमाणे त्यांच्या भाषेत म्हणजे गोंडी भाषेत प्रत्येक गावात ही माहिती लोकांपर्यत पोहचविण्यात आली नाही.

ब) कलम 6(अ) व (ब) ची सुध्दा सुयोग्य अंमलबजावणी करण्यात आली नाही. निस्तार पत्रकात खसरा नंबर लिहलेले असले तरी त्याप्रमाणे प्रत्यक्ष वन क्षेत्राच्या जमिनीवर डिमार्केशन कधिच करण्यात आले नाही. त्यामुळे काय बदल होत आहेत व त्यांचे आपल्या जीवनावर काय परिणाम होतील हे लोकांना कळले नाही. ते कळावे व लोकांनी योग्य वेळी आक्षेप घ्यावेत यासाठी प्रयत्नच करण्यात आले नाहीत.

* गडचिरोली जिल्हयातील वनबंदोबस्ताचे राजपत्रात प्रकाशन स्थगित ठेवण्याचा शासकीय निर्णय कारणांचे निराकरण न करताच फिरविण्यात आला - हा निर्णय झाले नसते तरी हे संकट टळू शकले असते.

क) 1989 सालीच लोकांनी या वन बंदोबस्ताला विरोध केला होता. तत्कालीन गडचिरोली व आरमोरी विधानसभा सदस्यांनीही याला तिव्र आक्षेप घेतला होता.

ड) परिणाम स्वरुप मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य व अर्थ सचिव यांनी गडचिरोली जिल्हयात येऊन लोकांचे व लोकप्रतिनिधींचे म्हणणे ऐकून घेतले होते.

( )


इ) सहसचिव, महसूल व वन विभाग, महाराष्ट्रराज्य यांनी दि.30 नोव्हेंबर-1989 ला श्री.सुखदेवबाबू उईके, तत्कालीन विधानसभा सदस्य व समिती प्रमुख अनुसूचित जमाती कल्याण समिती यांना पत्र क्र. एफ् एल् डी 3685/9316/फ-2 द्वारा कळविले होते की -

"गडचिरोली जिल्हयातील वन जमिनीबाबत भारतीय वन अधिनियम 1927 खालील कलम 20 ची अधिसूचना प्रसिध्द करणेसाठी शासनाने दि.21-10-89 च्या पत्रान्वये स्थगिती दिलेली असुन सर्व संबंधीतांना तसे कळविण्यात आले आहे."

असे असतांनाही ज्या कारणाने हि स्थगिती देण्यात आली होती त्या कारणांचे निराकरण न करता 11 मार्च 1993 रोजी शासनाने ही अधिसुचना राजपत्रात प्रसिध्द करुन टाकली. असे झाले नसते तर ही चूक टाळता आली असती.


- मोहन हिराबाई हिरालाल
सदस्य, निस्तार समिती
तथा संयोजक, वृक्षमित्र
टंडन वाडा, गांधी चौक,
चंद्रपूर-442402
फोन नं.07172-58134

FOREST WITH NISTAR RIGHT



	Mendha (L.)	Japi	Kakdyeli	Hirange	Yerandi	Markegaon	Paraswadi	Rajoli	Lekha	Pandharsada	Kharkadi
1955	1788.06	1255.3	852.93	555.52	470.53	414.47	390	369	279.92	217.54	50.89
1992	149.85	299.53	542.48	46.28	70.44	100.71	65.34	122.25	117.53	81.2	50.89

FOREST AVAILABLE ,NEED & KEPT 1992



FINDINGS OF

SAMPLE STUDY OF ELEVEN VILLAGES IN

TEH . DHANORA , DIST . GADCHIROLI OF MAHARASHTRA STATE

CHANGE IN NISTAR CATEGORIES OF VILLAGES

DUE TO FOREST SETALMENT IN 1992

STUDY DONE BY

VRIKSHAMITRA

OFFICE :- TANDON WADA , GANDHI CHOWK , CHANDRAPUR - 442 402 (MAHARASHTRA) , PHONE : 07172 - 58134 , E - MAIL : vriksha@nagpur.dot.net.in

Sl. No.	Name of the Village	Sensus Code No.		Forest area For Nistar - FW & ST Hec.	Area Decl - eared as RF Hec. In	Area Kept for Nistar Hec. In	Population Persons In		Fuel Wood Need (0.27 M. T. / Person / Yr) M. T.		Production of FW (0. 2 M. T. / Hec. / Yr) M. T.		Surplus / Deficit (+) / (-) M. T		Surplus / Deficit (+) / (-) Hec.	
		1981	1991	1955	1992	1992	1955	1992	1955	1992	1955	1992	1955	1992	1955	1992
1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12	13	14	15	16	17
1	Mendha (L.)	541	78	1788.06	1639.21	149.85	200	367	54	99.09	357.61	29.97	(+) 303.61	(-) 69 12	(+) 1518 05	(-) 345.60
2	Japi	769	263	1255.3	955.77	299.53	200	300	54	81	251.06	59.9	(+) 197.06	(-) 21 10	(+) 985.30	(-) 105.50
3	Kakdyeli	543	175	852.93	310.45	542.48	228	315	61.56	85.05	170.58	108.49	(+) 109.02	(+) 23 44	(+) 545.10	(+) 117.20
4	Hirange	353	132	555.52	509.24	46.28	140	165	37.8	44.55	111.1	9.25	(+) 73.30	(-) 35.30	(+) 366.50	(-) 176.50
5	Yerandi	524	170	470.53	400.09	70.44	181	205	48.87	55.35	94.1	14.08	(+) 45.23	(-) 41.12	(+) 226.15	(-) 205.60
6	Markegaon	539	79	414.47	313.76	100.71	180	250	48.6	67.5	82.89	20.14	(+) 34.29	(-) 47.36	(+) 171.45	(-) 236.80
7	Paraswadi	545	177	390	324.66	65.34	150	171	40.5	16.17	78	13.06	(+) 37.50	(-) 33.11	(+) 187.50	(-) 165.55
8	Rajoli	526	171	369	246.75	122.25	430	460	116.1	129.6	73.8	24.45	(-) 42.30	(-) 105.15	(-) 211.50	(-) 525.75
9	Lekha	527	77	279.92	62.39	117.53	260	421	70.2	113.67	55.98	23.5	(-) 14.22	(-) 90.17	(-) 17.10	(-) 450.85
10	Pandharsada	587	183	217.54	136.34	81.2	140	275	37.8	74.25	43.5	14.85	(+) 5.70	(-) 59.40	(+) 28.50	(-) 297.00
11	Kharkadi	530	68	50.89	Nil	50.89	150	220	40.5	59.4	10.17	10.17	(-) 30.33	(-) 49.23	(-) 151.65	(-) 246.15

CHANGE IN NISTAR CATEGORIES OF VILLAGES FROM 1955 TO 1992

YEAR	SURPLUS	SELF SUFFICIENT	DEFICIT	TOTAL
1955	7 (63.63 %)	1 (9.1 %)	3 (27.27 %)	11 (100 %)
1992	1 (9.1 %)	0 (0 %)	10 (90.90 %)	11 (100 %)

चिरंजीवी विकासासाठी सुरक्षित स्वच्छ व स्वस्त पर्यावरणीय वीज

नरेंद्र बेस
कार्याध्यक्ष
वनसंपदा
श्वापदस्वेडर.

★ जनसामान्यांच्या मते वीज

वाफेवर चालणारे रेल्वे इंजिन, रॉकेल जाळून प्रकाशमान होणारी दिवाबत्ती, स्वयंपाकाची चूल, इत्यादींच्या तुलनेत विजेचे रेल्वे इंजिन, विजेचे दिवे व स्वयंपाकाचा विजेचा स्टोव किंवा हिटर हे प्रदुषणमुक्त समजले जातात. स्वातंत्र्यानंतरच्या मागिल ५० वर्षात विजेचा अधिकाधिक वापर हे प्रगतीचे लक्षण समजले गेल्यामुळे दैनंदिन जीवनात वीज सर्वानाच हवी-हवीशी वाटू लागली. ती मुबलक असावी पण महाग नसावी. उलट ती उत्तरोत्तर स्वस्त होत जावी. फुकट मिळाली तर अधिकच उत्तम. तशीच विजेच्या वापरातून कारखानदारी व उत्पादन वाढत असल्यामुळे ती गरिबांना तारणारी असे सामान्य जनांना वाटते.

★ विजेचे वास्तव :-

सामान्य जनांना वीज हा स्वच्छ उर्जेचा प्रकार वाटतो. ती त्यांना मुबलक प्रमाणात हवी आहे. स्वस्त व फुकट देखील हवी आहे. व मुख्य म्हणजे ती त्यांच्या मते गरिबांना तारणारी आहे. तेव्हा जनतेची अशी इच्छा पूर्ण करणे हे राज्यकर्त्यांचे कर्तव्यच ठरते. म्हणुनच मग मेघाप्रकल्पाचे आकर्षण वाढते. सार्वजनिक क्षेत्रात जमत नसली तर खाजगी क्षेत्राची उपयुक्तता सिध्द करण्यास नोकरशाहीने आगळी-वेगळी तत्परता दाखवून एनरॉनच्या पतोपाव रिलायन्सचा पाताळगंगा व इस्पातच्या भद्रावती यासाठी राज्यकर्त्यांना धडाक्याने करार करून टाकण्यास लक्ष मोलाची मदत केली. म्हणुनच सदोष करारामधल्या अनियमित

व मृदी सोयीस्करपणे दुर्लक्षिल्या गेल्या आणि मग प्रत्यक्षात वाढीव वीज उत्पादन हे वाढीव थकबाकीसाठी कारणीभूत ठरले. ३१ डिसेंबर २००० रोजी राज्य विद्युत मंडळाची एकुण थकबाकी ५ हजार २४६ कोटी म्हणजे मुद्दलाच्या ४०% इतकी नरेंद्रविलेरी गेलेली आहे. वहन व वितरणातील तूट व विजेची चोरी ही देखील वीज उत्पादनाच्या ४०% इतकी आहे. यामध्ये मंडळाचे वार्षिक नुकसान अंदाजे ४ हजार ८८६ कोटीच्या घरात जाते. तरी देखील विजेच्या टंचाईबद्दल सतत ओरड होत असते. चोरून वीज वापरणारे व बिलाची कोट्यावधी रूपयाची थकबाकी ठेवणारे एकीकडे मजा मारतात व प्रामाणिकपणे बील भरणारे ग्राहक भारनियमाची झळ सोसत राहतात. विजेच्या बाबतीतले हे असे दारूण वास्तव समोर आले आहे.

* वास्तव नैसर्गिक संसाधनांचे

वरील वास्तवाच्या पार्श्वभूमीवर नैसर्गिक संसाधनाचे वास्तव जाणून घेणे योग्य ठरावे. महाराष्ट्रात औष्णिक विजेचे उत्पादन सर्वाधिक आहे. खापरखेडा कोराडी चंद्रपूर परळी भुसावळ नाशिक व पर्ली या वीज केंद्रात कोळशाचा इंधन म्हणून वापर करून वीज उत्पादन केले जाते. एक युनिट वीज तयार करावयास साधारणपणे १ किलो कोळसा, १ किलो प्राणवायू, ४१०० घनमिटर पाणी, २.५४ मिली लीटर स्नेहिज तेल या नैसर्गिक संसाधनाचा वापर होतो. महाराष्ट्रात दरदिवशी सरासरी १४० दशलक्ष युनिट औष्णिक वीजेचे उत्पादन होते. यासाठी दरदिवशी १४० हजार मे. टन कोळसा, १४० हजार मे. टन प्राणवायू, ६ लाख ८ हजार घनमिटर पाणी, लिटर स्नेहिज तेल याप्रमाणात नैसर्गिक संसाधनाचा वापर होतो. कोट्यावधी वर्षापूर्वीच्या नैसर्गिक उलाढालीतून तयार झालेला भूगर्भातील कोळसा अजून २५ ते 30 वर्ष उपलब्ध होऊ शकेल असा तज्ज्ञांचा कयास आहे. भूतलावरील २२ लाख [illegible]

वातावरणातील हवेत २०% असणारा प्राणवायू सध्या १४% जंगलाच्या प्रमाणात नक्कीच कमी झालेला असणार. वीज निर्मितीतील वापरामुळे तो अधिकच कमी कमी होत जाणार. पाण्याचा पुरवठा नदीवर बांधलेल्या धरणातून केला जातो, दरवर्षी साचत असलेल्या गाळामुळे धरणाची परिणामकारक क्षमता दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यातील पाण्याच्या वापरावर शेतीचा व शहरांचा दबाव दरवर्षी वाढत आहे. कधी कधी धरणे पूर्णपणे भरत देखील नाहीत. २००१ सालची स्थिती विदारक आहे. खनिज तेल देखील आज नाही उद्या संपणारच आहे.

* प्रदुषणाची व्यथा

विजेसाठी नैसर्गिक संसाधनाच्या मोठ्या प्रमाणातील वापरामुळे प्रदुषणाची पातळी देखील तितकीच मोठी असते. प्रतेक युनिट वीज उत्पादनामागे दीड किलो कर्बाम्लवायू वातावरणात सोडला जातो. चाळीस ग्रम राख मूलद्रावरील रस्वबंधाऱ्यात सोडली जाते. व साधारणपणे २३०० ते २४०० किलो कॅलरी उष्णता देखील वातावरणात सोडली जाते. रोजचे सरासरी वीज उत्पादन १४० दशलक्ष युनिट धरले तर २१० हजार मे. टन कर्बाम्लवायू, ४६ हजार मे. टन राख व ३१.६ हजार दशलक्ष किलो कॅलरी उष्णता वातावरणात फेकली जाते. परिणामतः वातावरणातील कर्बाम्लवायूचे प्रमाण मागील ३० वर्षात १२ टक्क्यांने व तापमान मागील १०० वर्षात ०.६ डीग्री सेल्सियसने वाढले असल्याचे सर्वेक्षणात निष्पन्न झाले आहे. राख वाहून नेणाऱ्या पाईप लाईन शेजारची जमीन व नाले राखमय झालेले दिसतात. राखबंधाऱ्यातील सुकलेली राख वाढली वाऱ्यामुळे जेव्हा उडते तेव्हा जवळच्या वस्तू देखील दिसत नाहीत. परिसरात राहणाऱ्या लोकवस्तीला राखेचा कायमस्वरूपी त्रास सहन करावा लागतो. वीज केंद्रांतील सांडपाणी व राख मिश्रीत पाणी प्रसंगी शेजारच्या नदीत

पोलचत असल्यामुळे नदीचे पाणी दुषित झालेले आढळते.

व्यवेचे गांभीर्य

* प्राणवायूची कमतरता

इतक्या मोठ्या प्रमाणात प्राणवायू अन्य कोणत्याच प्रक्रियेमध्ये खर्च होत नाही. प्राणवायूचे पुनर्भरण करणारे जंगल कमी होत आहेत. प्राणवायूची कमतरता शहरात जाणवायला लागलेली आहे. त्यापरत्वेच कोराडी चंद्रपूर या केंद्रांतून तयार होणाऱ्या विजेसाठी जितका प्राणवायू खर्च होतो तितक्या प्राणवायूचा भरणा होण्यासाठी तज्ञांच्या मते अंदाजे ३८ लक्ष एकरमध्ये घनदाट जंगल असावे लागेल. वीज वापरणारे कोळसासोबत प्राणवायू देखील खर्च करीत असल्यामुळे प्रचंड प्रमाणातील रोपवन निर्मितीची जबाबदारी म्हणूनच वीज ग्राहकावरच येऊन पडले. याचाच अर्थ असा की बिल न भरणारे किंवा चोरी करणारे वीज ग्राहक बेजबाबदारपणे प्राणवायू खर्च करीत असतात. म्हणजेच ते गरीबांच्या वाट्याचा प्राणवायू स्वतःसाठी खर्च करतात. प्राणवायू खरेदी करण्यासाठी क्रय शक्ती नसल्यामुळे प्राणवायू अभावी गरीब लोकसंख्याच बळी जाणार हे निश्चित.

* कर्बाम्लवायूचे आधिक्य

वीज निर्मितीच्या प्रक्रियेत जसा मोठ्या प्रमाणात प्राणवायू वापरला जातो. तसाच मोठ्या प्रमाणात कर्बाम्लवायू वातावरणात सोडणारी विजेशिवाय अन्य उत्पादन प्रक्रिया नाही. कर्बाम्लवायूचे वातावरणातील वाढते प्रमाण आता चिंतेचा विषय ठरला आहे. त्यामुळे प्राणवायूचे घटते प्रमाण त्या प्रमाणात कमी झालेच आहे. हा वायू वातावरणाचे तापमान वाढवण्यास कारणीभूत ठरत आहे. जगभरे एकरातील घनदाट जंगल व अशाच जंगलातील फुलझाडांची मुबलकता यामुळेच कर्बाम्लवायूचे

* पाण्याचे दुर्भिक्ष

नदीवर बांधलेल्या बंधाऱ्यातून किंवा धरणातून सर्वच वीज केंद्रांना पाण्याचा पुरवठा होतो. कोराडी खापरखेडा या वीज केंद्राना पेंचवरील धरणातून तर चंद्रपूर येथिल वीज केंद्राला ईराईवर बांधलेल्या धरणातून पाणी मिळते. पेंचप्रकल्पावर नागपूर शहराचा व शेतकऱ्यांचा दबाव तर ईराई धरणावर चंद्रपूर शहराचा दबाव वाढत आहे. आणि तो दिवसेंदिवस वाढत जाणार आहे. गाळ साचत असल्यामुळे पाणी साठवणूकीची धरणाची क्षमता कमी झालेली आहे. व दिवसेंदिवस ती कमी होत जाणार. संभलपूर विद्यापिठाने केलेल्या अभ्यासाप्रमाणे हिराकुंड धरणाचे आयुष्य १११ वर्षांवरून ७७ वर्षांवर आलेले आहे. व २०५० सालापर्यंत ते अर्धाहुन अधिक गाळाने भरलेले असेल. वीज केंद्रानां पाणी पुरवठा करणारी धरणे भरलेली दिसतील परंतू नजिकच्या भविष्यातच फसवणूक होणे संभवते. परिस्थितीचे गांभिर्य धरणाच्या धारणक्षमतेचा अभ्यास केल्यानेच कळेल.

* रास्त्याची कर्वीण विल्हेवाट

दर तीन युनिट विज निर्मितीमागे अंदाजे १ किलो निर्माण होणारी राख त्यासाठी बांधलेल्या राख बंधाऱ्यात पाण्याच्या पंपाद्वारे सोडली जाते. अशा राख बंधाऱ्यात खापरखेडा (२८२.५ हेक्टर) कोराडी (५२५ हेक्टर) चंद्रपूर (२६६ हेक्टर) नाशिक (२१४ हेक्टर) परळी (४७२ हेक्टर) व भुसावळ (२०० हेक्टर) शेत जमिन वापरली गेली आहे. मार्च २००१ पर्यंत या बंधाऱ्यावर खापरखेडा (३७४६ लक्ष) कोराडी (३४४० लक्ष) चंद्रपूर (१७५० लक्ष) नाशिक (५४३९ लक्ष) परळी (२१८५ लक्ष) व भुसावळ (६४६३ लक्ष) खर्च झालेले आहे. विविध कामासाठी राखेचा वापर वाढणे अपेक्षित आहे. परंतु भुसावळ खेरीज अन्य राखबंधाऱ्यांची स्थिती निराशा-जनक आहे. वाहतूकीचा खर्च या संबधात मोठाच अडसर ठरला आहे. पुढील ५ ते ७ वर्षात बंधाऱ्याची उंची वाढवीने किंवा नविन बंधारे क्रमप्राप्त आहे. उंची वाढविण्यास मर्यादा

व त्यांच्या संवर्धनाची जबाबदारी देशातील वापरणाऱ्यांचीच असेल. कारखानदारी क्षेत्राचे या बाबतीतले त्यांचे योगदान तपासून घ्यावे लागेल. विजेची चोरी करणारे तसेच बील न भरणारे थकबाकीदार कर्जमाफीच्या बाबतीत देशातील बेजबाबदार ठरतात.

* वाढत्या तापमानाचे चटके

विसाव्या शतकात ०.६ डिग्री सेल्सियसने वाढलेले तापमान २०३० पर्यंत १.० डिग्रीने व एकविसाव्या शतकाच्या शेवटी ३.०० डिग्रीने वाढण्याचा धोका दर्शविला गेला आहे. मागील १०० वर्षात समुद्राची पाण्याची पातळी २५ सेंटीमिटरने वाढली. ती पुढील १०० वर्षात ५० सेंटीमिटरने वाढेल. जगातील ७०% लोकसंख्या ही समुद्र किनाऱ्यावर राहते ९२ दशलक्ष लोकांना पुनर्वसनाची झळ पोचण्याचा धोका संभवतो. विशिष्ठ क्षेत्रातील वनस्पती नष्ट होऊन जंगले जंगले उत्तर ध्रुवाकडे सरकत जाईल असे तज्ञांचे मत आहे. लहरी पावसामुळे शेतीच्या उत्पादनाचे नुसकान अनुभवले जात आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाई गंभीर झाले-ली आहे. पाण्यासाठी राज्या-राज्यामधील भांडणे राष्ट्रा-राष्ट्रा-मधिल भांडणात बदलत आहे. हिवाळ्याचे दिवस मुख्यतः डिसेंबर जानेवारी या कालावधीसाठी मर्यादीत होऊन गेले आहेत. मलेरियाच्या प्रसारात जगातील ५० ते ८० दशलक्ष लोकसंख्या येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पुष्कळी क्षेत्र व पुरग्रस्त क्षेत्र याची आळीपाळीने विभागनी झाली असल्याचे दिसते. इंडोनेशिया व ग्वाटेमाला येथिल वनवा वाढत्या तापमानाची साक्ष देत आहे. वाढत चालेलेल्या तापमानामुळे उद्भवलेल्या परिस्थितीत किमान सोयी उपलब्ध व्हाव्यात म्हणून दिवसेंदिवस विजेचा वापर अधिकाधिक वाढवावा लागत आहे. ऋतूचक्राच्या संदर्भात विजेच्या वापरामुळे एक वेगळेच दृष्टचक्र निर्माण झाले दिसते.

पडतात. नवीन बंधाऱ्यासाठी जमिन मिळविणे यापुढे सोपे राहिले नाही. मातीच्या विटा तुलनेने स्वस्त म्हणून रस्त्याच्या विटांना मागणी कमी. मातीच्या विटावर बंदी नाही. यापुढे रस्त्याच्या विल्हेवाटीचा खर्च परवडण्यापलिकडचा असणार. येत्या ५ ते ७ वर्षानंतर रस्त्याची विल्हेवाट होऊ न शकणारा असल्यामुळे पीज निर्मितीत घट करावी लागणे संभवते.

* कोळशामधिल दगड- धोंड्यांचा काय ?

कोलसा पुरविणाऱ्या कोल इंडियामंतर्गत कंपन्या रेल्वे वॅगनमधून कोळशासोबत दगड धोंडे देखील पाठवित असतात. कोळश्यापासून त्यांना वेगळे करण्याचे काम प्रत्येक पीज केंद्रात कंत्राट देवून करावे लागते. वेगळे करण्यात आलेल्या दगडांची अन्य ठिकाणी विल्हेवाट करण्यासाठी दुसरा कंत्राट द्यावा लागतो. अशा दगडांच्या विल्हेवाटीसाठी सर्वच पीज केंद्रांचे जागा अपूरे पडत आहे. दहा वर्षापूर्वी अंदाजे ३% दगडाच्या तुलनेत आज ही टक्केवारी जरी कमी झाली असली तरी विल्हेवाट करण्या लायक असलेली दगड काही थोडे-थोडके नसतात. पीज केंद्राच्या भिंतीबाहेर त्यांची विल्हेवाट केली तर नविनच प्रश्न उद्भवतात. प्रश्नाची सोडवणूक कठीण होत चाललेली आहे.

* कोलमिल रीजेक्टरची विल्हेवाट

कोळशातील दगडांनी जरी कठिण परिस्थिती निर्माण केली. तरीच अवघड परिस्थिती कोलमिल मधून बाहेर फेकल्या गेलेल्या कच्या कोलसा मिश्रीत छोट्या दगडांनी निर्माण केलेली असते. या रीजेक्टची विल्हेवाट करण्यात देखील जमीन व्यापली जात आहे. पूनर्वापर परवडणारा नाही. त्यासाठी सुयोग्य यंत्रणा उभारण्याचा निर्णय होत नाही. पीज केंद्राच्या भिंती बाहेर त्याची विल्हेवाट केल्यास लोक तुटून पडतात. व कायदा कायदा सुव्यवस्थेला बाधक परिस्थिती निर्माण होते. त्याच्या

रिलिजवाचा निर्णय जाहीर होताच राजकीय हितसंबंधाचा आधार लाभलेल्यांचा धुडगुस सुरू होऊन सर्व प्रक्रियाच धोक्यात येते. प्रसंगी गुन्हेगारी स्वरूपाच्या घटनांची मालीकाच सुरू होते.

* प्रश्नग्रस्त वीज

कोळसा तेल पाणी व प्राणवायू यासारख्या नैसर्गिक संसाधनांच्या १००% वापरातून निर्माण केली जात असलेली वीज तीचे वरून कुरसांना ४०% वाया जाती ती वापरल्यानंतर एकुण महसुलाच्या ४०% महसूल कायमस्वरूपी थकबाकीत राहतो. ११३७ कोटी ७७ लाख माफी देवून २९० कोटी माफ करण्यासाठी शासनाकडेतर्फे तरतूद करून ठेवली जाती. प्रदुषणाची व्यथा व व्यथेचे गांभीर्य पुरते समजून न घेता व त्या दिशेने निर्धारपूर्वक प्रयत्न न करता उलट उनाड्या ठेवली जाते. अशा गुंतागुंतीच्या व अवघड प्रश्नाच्या चक्रव्युहात सध्याची वीज सापडलेली आहे. हा चक्रव्युह भेदण्याचा सर्वसमावेशक प्रयत्न कोणत्याच पातळीवर न करता हजारो मेगावाट विजेची गरज असणाऱ्या उपसाजलसिंचनाच्या योजना पश्चिम महाराष्ट्रात रखवित्या जात आहे. एकुण महसूलाच्या ४०% थकबाकीचा सरळ सोपा अर्थ म्हणजे ४०% नैसर्गिक संसाधनांचा फुकट वापर करणाऱ्या वीज ग्राहकांच्या विजेची मागणी (फुकाच्याचे लाड पुरविण्यासाठी) पूर्ण करण्यासाठी प्रमाणिक वीज ग्राहकावर भारनियमन लादने व दरवाढीचा भूर्दंड त्याच्यावर बसविणे. विजेला गुंतागुंतीच्या प्रश्नाच्या चक्रव्यूहात कायमचे अडकवून नवनविन वीज निर्मिती केंद्र उभारणे व वीज खरेदीचे करार करने म्हणजेच करारद्वारे तिजोरी जाणारा जनतेचा पैसा गटारात वाहण्यासारखे ठरते

* वीजग्रस्त ग्राहक

वीजेचे उत्पादन हे सार्वजनिक करून व्यापार करण्यासाठी नसुन सर्वहितार्थी से वापरण्यासाठी केले जाते. हे एक वास्तव आहे. ग्राहकांच्यावर वीज वापरण्याविषयीच्या इच्छेनुरूप तीचे उत्पादन

दरम्यान वाढवावे किंवा घटवावे लागतात. ग्राहकाची इच्छा ही या बाबतीत सर्वोपरि असते म्हणूनच वीज उत्पादनासाठी खर्ची पडणारे नैसर्गिक संसाधन किंवा उत्पादन प्रक्रियेत निर्माण होणारे प्रदुषण व त्याचे दुष्परिणाम याचे गांभिर्य हे सरस्वरी ग्राहकांच्या इच्छेवर अवलंबून असल्यामुळे प्रश्नग्रस्त विजेला प्रश्नमुक्त करण्याची मुख्यभूमिका वीज ग्राहकाचीच असावी लागेल विजेचा अधिकाधिक वापर करून कोळसा तेल पाणि व प्राणवायू इत्यादी नैसर्गिक संसाधन लवकर संपवायचे की किमान वापर करून ते अधिक काळ टिकून राहतील हे ग्राहकांनीच ठरवायचे आहे. हवामानबदलास कारणीभूत ठरलेल्या प्रदुषणाला नियंत्रीत ठेवण्याची जबाबदारी देखील वीजग्राहकाकडेच येते. विजग्राहकांनी निर्माण केलेल्या दबावा मुळेच वीजवहनातील ४०% तुटीतून वाया जात असलेली नैस-र्गिक संसाधनाची बचत होणे संभवते. केवळ ५०% विज बिला -चि वसूली ही समस्या अंतर्गत वीजग्राहकांनीच निर्माण केली असल्याचे लक्षात यावे. विजेच्या व्यवहारात केंद्रस्थानी असलेला वीज ग्राहक मात्र अनेकविध दुष्प्रवृत्तीच्या आहारी गेला दिसतो. तो वेगवेगळ्या क्लृप्त्या योजून वीजेची चोरी करू इच्छीतो. योग्य दाबाची अखंड वीज मीळत राहावी अशी आकांक्षा सदासर्वदा बाळगणारा विजग्राहक वितरण प्रणालीच्या गरजेप्रमाणे मात्र सहकार्य करण्यास उदासीन असतो. भार-नियमाची अपरिहार्यता समजून न घेता त्याबाबत नानाविध तक्रारी करतो. व प्रसंगी तो आक्रमक देखील होतो. आकोडे टाकून मीटरबाह्य विजेचा हा अधिकार म्हणून समजणारे वीज ग्राहक काही थोडे थोडके नाहीत. वीजग्रस्त ग्राहक प्रश्नग्रस्त वीजेला पचवू पाहत आहेत. विपरीत व विसंगत परिस्थिती यालाच म्हणावी.

अत्यंत गुंतागुंतीचा विषय होऊन बसलेला वीजेचा प्रश्न स्वतःचे हितसंबंध सांभाळून तुकड्या तुकड्यानेच पाहीला जातो. व तसाच तो सोडवण्याचा प्रयत्न केला जातो ही या बाबतीतील आतापर्यंतची एक शोकांतिका होय. गुंतागुंतीच्या प्रश्नाला सर्वंकष विचाराच्या आधारेच सोडवता येऊ शकेल. हे वास्तव जोपर्यंत लक्षात घ्यावयास हवे. या दिशेने करण्यात लागणाऱ्या चौफेर प्रयत्नांत व्यवहारात्मक व अंमलबजावणीच्या पातळीवर पुढील सुचनांचा व पर्यायांचा गांभिर्याने विचार व्हावा.

▲ <u>वीज ग्राहकांचे संघटन</u>

१) प्रामाणिक वीज ग्राहकांनी १० ते ३० च्या संख्येत बचतगट स्थापून संघटीत व्हावे. अशा वीज ग्राहकाच्या बचतगट समुहाने गाव अथवा मोहल्ला पातळीवरच्या वितरण प्रणालीची संपूर्ण जबाबदारी स्विकारावी व ग्राहकाधारीत व्यवस्था निर्माण करावी.

२. वीज ग्राहक बचतगट समुहाने थकबाकीदार ग्राहकांची (विशेषकरून थकबाकीदार कारखानदारांची) वीज तोडण्यासाठी अथवा विजेचा वापर कमी करण्यासाठी संघटीतपणे दबाव आणावा. अशा कारखान्यांच्या उत्पादनावर सामुहीक बहिष्काराचा पर्याय परिणामकारक होऊ शकेल.

३. प्रणवायूच्या पुनर्भरणाची जबाबदारी वीज ग्राहकांच्या बचत गटांनी स्वेच्छेने स्विकारून मासिक १ किलो प्राणवायूची किंमत १० रू./- प्रत्येक वीज ग्राहकाने बचत करून निर्माण होणाऱ्या भांडवलातून रोपवन निर्मितीत करावी

४. वीज वहनातील तुट कमी करण्यासाठी व मिटरशिवाय वीज वापरली जाणार नाही यासाठी सर्व बचतगटांनी संघटीत प्रयत्नातून दबाव वाढवावा.

१. नानाविध प्रश्नाच्या शोधण्यात अडकलेल्या बीजेला मुक्त करण्याची अंतरिक तळमळ असणाऱ्या बीज कामगारांनी (यात अभियंते कामगार व कर्मचारी यांचा समावेश असेल) स्वतःचा समुह तयार करून त्याची ग्रिन ब्रिगेड म्हणून ~~ओळख घ्यावी व या ग्रिन ब्रिगेडला बिज संवर्धनाच्या विविध~~ पातळयावरील व्यवस्थापणाने अधिकृत मान्यता द्यावी.

२. कोळसा तेल पाणी व प्रणवायू हे नैसर्गिक संसाधने वापर जाणार नाहीत व त्यांचा कमीतकमी वापर करून अधिकाधिक बीज उत्पादन केले जाईल असा पद्धतीची देखरेख कार्यपद्धती बदल व सुधारणा तंत्रज्ञान इत्यादी हे ग्रीन ब्रिगेड स्विकारेल व कामकाजात दाखल करून घेईल.

३. बीज उत्पादनाच्या ८ ते १० टक्के बीज प्रतेकच बीज केंद्रांतर वाढवावी लागतेः वापरलेल्या बीजेच्या प्रमाणात प्राणवायूची भरपायी होण्याइतपत प्रत्येक बीज केंद्राने रोपवन निर्मिती करावी असा आग्रह ग्रीन ब्रिगेडने धरावा व रोपवन संवर्धन/ संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी स्वतः स्विकारावी.

४. अभ्यासाद्वारे समुचित निसर्गचक्राचा शोध घेऊन बीज उत्पादनाच्या प्रक्रियेत किंवा प्रदुषण नियंत्रणासाठी असा निसर्ग-चक्रांतर दाखल करून घेण्याचा आग्रह व प्रयत्न ग्र ग्रीन ब्रिगेड करेल.

▲शेतकऱ्यांचे संघटन

१. बीज उत्पादन खर्चात प्राणवायूचा खर्च समाविष्ठ केला जात नाही. तो समाविष्ट केला जावा ही मागणी बीज ग्राहक शेतकऱ्यांनी बचतगटाच्या माध्यमातून रेटावी तसेच मीटरद्वारे बीज स्विकारावी.

२. शेतकरी उत्पादनाद्वारे वातावरणातील कर्बाम्लवायू शोषून घेतला जातो व त्याचबेळी प्राणवायू वातावरणात सोडला जातो शेतकऱ्यांच्या बचतगटाने प्राणवायूच्या मोबदल्याची मागणी करावी व वापरलेल्या बीजबीलाचे भूगतान करावे. प्राणवायूच्या

मोबदला विजेच्या प्रत्येक युनिटशी जोडून बचतगटातील शेतकऱ्यांनी वापरलेल्या वीजेच्या प्रमाणात ते बचतगटाच्या मांडवलात जमा करता येईल

३. वापरलेल्या वीजेपोटी खर्च झालेल्या प्रणवायूची भरपाई करण्यासाठी शेतकऱ्यांच्या बचतगटांनी मिळून गावपातळीवर ग्रामपवन निर्माण करणे व ग्रामपवनाची जबाबदारी ग्रामसभेने वरिलेल्या समितीकडे (व्यवस्थापन) असावी.

४. नैसर्गिक साधनसंपत्तीवर संबंधित क्षेत्रातील ग्रामसभेचा हक्क प्रस्तापित होईल असा प्रयत्न शेतकऱ्यांच्या बचत गटाने करावा जेणेकरून त्यापासून मिळणाऱ्या मोबदल्यापासून ग्रामसमुह वंचित राहणार नाही.

५. जमिनित खोलवर गेलेले पाणी उपसण्यासाठी जास्तीची वीज खर्च होते. ती कमी खर्च व्हावी. म्हणून जमिनितील पाण्याची पातळी उंचावण्यासाठी मातीचे अडवा पाणी जीरवा हा कार्यक्रम गावपातळीवर राबविण्यात शेतकऱ्यांच्या बचत-गटांनी पुढाकार घ्यावा.

६. भारनियमन कमी करण्यासाठी रात्रीच्या वेळी विजेची मागणी वाढणे गरजेचे आहे. शेतीतील विहिरी शेजारील पाण्याची टाकि बांधून दिसत्यास्त्र रात्रीच्यावेळी ती भरून दिवसा सिंचन करणे सोईचे होईल. शेतकऱ्यांच्या बचत-गटाने अशी व्यवस्था उपलब्ध करून देण्याची मागणी होती.

* पर्यावरणीय वीज

नविन वीज केंद्राची उभारणी करून उत्पादनाची स्थापित क्षमता वाढविण्याचा पर्याय राजकीय शासकीय प्रशासकीय व कामगारांचे हितसंबंध जोपासणारा असल्याकारणाने वीजेचा प्रश्न सुटण्या ऐवजी नसलताही पटकन स्थिरावला जातो. परंतू त्यामुळे स्थापित क्षमतेचा पुरेपूर वापर करण्याकडे व्यवस्थापनातील त्रुटी व चोरी नियंत्रित करण्याकडे दुर्लक्ष होते.

उत्पादकतेचा विचार पुर्णपणे मागे पडतो. म्हणूनच पर्यावरणीय विजेची कास धरून यापूढे वाटचाल झाली तरच वीजेचा प्रश्न पूर्णांशाने जरी नाही तरी थोड्याफार प्रमाणात मार्गी लागू शकेल या दिशेने होणाऱ्या वाटचालीत खालीलप्रमाणे टप्पे असू शकतील...

१. नविन मोठे वीज केंद्रे न उभारण्याचा पक्का निर्धार.

२. भारांक वाढविणाऱ्या कार्यपद्धतीवर अंमल

३. वहनातील तुट कमी होईल असा कार्यप्रणाली सुधारण्यास प्राधान्य.

४. वितरण व्यवस्था वीज ग्राहकांच्या बचतगटाकडे सोपवून चोरीवर नियंत्रण

५. वीज उत्पादन स्वर्धात प्रणवायूच्या किमतीचा अंतर्भाव.

६. मीटरशिवाय व फुकट वीज पुरवठ्यास कायमस्वरूपी फाटा.

७. पाणी साठवणूकीची शेततळे ठिबिंगेजवळ व्यवस्था व रम्पिंग्या वेळी उपसा.

८. मातीं अड्वर- पाणी जीरवा या कार्यक्रमाचा व सेंद्रीय शेतीचा स्विकार व अमल.

९. विजेची मागणी उत्तरोत्तर कमी होईल अशा रीतीने पर्यायी उर्जा स्रोताचा अधिकाधिक वापर

१०. प्रत्येकालाच आपले घरातील असे ग्रामवन वा शेपवन यांचे सहभागी व्यवस्थापन.

विज निर्मितीसाठी वापरली जाणारी नैसर्गिक संसाधने ही चिरकाल टिकणारी नसून त्या कधितरी संपणाऱ्या आहेत. निसर्गतः तयार झालेले नदी, नाले, हे सांडपाणी वाहून नेणारे गटारे नव्हत आणि जमिनिचा पृष्ठभाग हा घाटेल तो कचरा घाटेल तीथे फेकण्यास उकिरडा नाही याची जाणिव ठेऊन उत्पादन केली जात असलेली व वापरली जाणारी वीज याला विचारात घेऊन पर्यावरणीय वीज म्हणावी लागेल. चिरंजिवी विकासाला, हेच खरे मार्ग लागणार.

ANNEXURE XVIII

Findings of the Field Research
of
Child Scientists and Women from SHG
From nine villages of Korchi block
on
Various issues in bio-diversity
in their own language

प्रकल्प विषय :-

दोरीचे विविध प्रकार झाडापासून तयार, होणा-या दो-या

१) पळस

उपयोग :- तेंदूपानाचे पुडे बांधण्यासाठी, गरदवा (दिवाळीत गाईच्या गळयात बांधतात) बनविणे.

बनविण्याची पध्दत :- पळसाच्या झाडाची मुळे आणून त्याला टोकाला दगडाने कुचलून दोर तयार करतात.

कच्चा माल उपलब्ध :- जंगलातून, शेतात (भर्रीमध्ये)

टिकाऊपणा :- तिन महिने

२) कुंभीच

उपयोग :- जनावराला बांधण्यासाठी (गैडा, दामळीएकासरा, वेसन, जोता,)

बनविण्याची पध्दत :- झाडाच्या फांदा सरळ असतील अशा कापणे व त्याची साल काढून त्यापासून दोर तयार करणे.

कच्चा माल :- जंगलातून

टिकाऊपणा :- १ वर्ष

३) अयटी (आटई)

उपयोग :- जनांवरांना बांधण्यासाठी (जेठा, वेसळी, गरदोवा, कासरा, जोता, दावा), बाज विणण्याकरिता, कावड बांधण्यासाठी, प्राण्यांना पकडण्याचे दोरीचे जाळे बनवितात.

बनविण्याची पध्दत :- झाडाच्या सरळ फांदया (दीड, दोन फुट लांब) कापून पाण्यात ११ दिवस दोबुन ठेवतात नंतर त्याला उन्हात वाळवितात नंतर त्याची साल काढून त्यापासून दोर बनवितात.

कच्चा माल :- जंगलातून

टिकाऊपणा :- १ वर्ष

४) सेहरा

उपयोग :- जनावरांचा गोठा तयार करतांना छपपर बांधताना, जनावरांना बांधण्यासाठी (गरदोवा, जेठा, दामळी, वेसळी, कासरा इत्यादी)

बनविण्याची पध्दत :- झाडाच्या सरळ फांदया कापून त्याची साल वेगळी करतात नंतर ठेहरा (दोर ऐटण्याचे साधन) वर दोर तयार करतात.

कच्चा माल :- जंगलातुन, *टिकाऊपणा* :- ४, ५, महिने ( )

५) सितुम (करू)

उपयोग :– जनावरांना बांधण्यासाठी (ओता, दावन, कासरा, गरदवा, जेठा, दामडी), तेंदु पत्ता पुढे बांधण्यासाठी, पाणी भरण्याच्या च-हाट, मोळी बांधण्यासाठी

बनविण्याची पध्दत :– सरळ फांदया कापणे त्याची साल काढून निसने व त्याला ऐटून दोर तयार करणे.

कच्चा माल :– जंगलातुन

टिकाऊपणा :– ४ महिने

६) दराची (भुईगोंगाल)

उपयोग :– जनावरांना बांधण्यासाठी (कासरा, जोता, गरदवा, दावन, वेसन) बाज विणण्यासाठी, कावड

पध्दत :– जुलै महिण्यात झाडाच्या फांदया सुकतात त्या कापून आणतात त्याची साल काढून ऐटून दोर तयार करणे.

कच्चा माल :– जंगलातून

टिकाऊपणा :– १ वर्ष

७) वाळा

उपयोग :– घराला जोडा बांधण्याकरिता, वाडी बांधण्यासाठी, मोळी बांधण्यासाठी

पध्दत :– फांदयाची साल काढून दोर बनविणे.

कच्चा माल :– जंगलातुन

टिकाऊपणा :– ८ महिने

८) फुटू डोरी

उपयोग :– जनावरांना बांधण्यासाठी (गरदोवा, जेठा, दामडी, सुरूई, वेसन), खाट विणण्यासाठी

पध्दत :– सरळ फांदया कापून पाण्यात ८ दिवस सडवणे व नंतर उन्हात १ दिवस वाळवून त्याची साल काढणे. त्याला ऐठून दोर तयार करणे.

कच्चा माल :– जंगलातुन

टिकाऊपणा :– १ वर्ष

९) टाडो

उपयोग :– जनावरांना बांधण्यासाठी (जेठा, दामडी, कासरा, गरदोवा)

पध्दत :– सरळ फांदया कापणे व साल अलग करून त्यापासून दोर बनवितात.

कच्चा माल :– जंगलातुन, *टिकाऊपणा* :– १ वर्ष

१०) *गट्टल*

उपयोग :– मासे पकडण्याच्या बासाच्या जाळयांना बांधण्यासाठी, सरळी

पध्दत :– कच्चेच कापणे साल अलग करून दोरी बनवणे व वापरणे.

कच्चा माल :– जंगलातुन

टिकाऊपणा :– ५ महिने

गावाचे नाव :- पांढरी गोटा

अभ्यास गट :- 1) सुनित जगदीश हुंड्रे

2)कु.फुलकैना जमकातन

3) कु. जानोबाई पोरेटी

मार्गदर्शक :- श्री. मोतीलाल गांवडे

प्रकल्पाचे नाव :- धान कांडण्याच्या पारंपरिक पध्दती

ढेकी

(धान कांडण्यासाठी पायाने चालवायचे लाकडी साधन)

ढेकीसाठी उत्तम लाकुड - तिवस आणी तिलसा, ढेकी गावातील सुतारच तयार करून देतात. ढेकीवर मुख्यता महिला धान कांडण्याचे काम करतात. साधारणपणे 1 कुडो धान कांडण्यास व पूर्ण स्वच्छ करून तांदूळ मिळण्यास एका महिलेला 1 तास लागतो.

फायदा :- वर्णन तांदूळ पॉलिश केलेला ढेकीचे तांदूळ (एच. एम. टी.)

1) आर्द्रता १०.१ ९.४९ कमी

2) प्रोटीन ६.०४ ६.७१ जास्त

3) फॅट ०.६४ ०.८० जास्त

जीवनसत्वे व खनिजे

1) B१ ०.०३ mg /१००gm ०.१० mg /१००gm तीनपट

2) B२ ०.०४ mg /१००gm ०.०९ mg /१००gm दुप्पट

3) कॅल्शियम ९.०० mg /१००gm ९.०० mg /१०० gm दुप्पट

4) आयर्न (लोहा) ०.६४ mg /१००gm २.२० mg /१००gm तीनपट

5) फॉस्फरस १५५ mg /१००gm १८५ mg /१००gm जास्त

testind done by Qualichem Laboratories, Nagpur Approved by food and Drugs Administration (M. S.)

ज्या घरामध्ये फक्त ढेकीचे तांदूळ वापरतात त्या घरी रोगांचे प्रमाण कमी आढळते.
ढेकीचे तंत्र :- वजन जास्त असल्यास वेळ कमी लागतो पण चुरा जास्त होतो. वजन कमी असल्यास तांदूळ चांगला निघतो परंतु वेळ व मेहनत जास्त लागते.

मुसळ :-

(धान कांडण्यासाठी हाताने चालवायचे लाकडी साधन)

मुसळासाठी उत्तम लाकुड :- तिवस आणी तिलसा, मुसळ गावातील सुतार करून घेतात. मुसळ चालविण्याचे काम महिलाच करतात. साधारणपणे १ कुडो धान कांडण्यास व पूर्ण स्वच्छ तांदूळ मिळण्यास एका महिलेला २ तास लागते.

फायदा :- साधारणपणे ढेकीवर कुटलेले व मुसळावर कुटलेले तांदूळ सारखेच फायदेशीर आहेत. गवांमध्ये मुसळापेक्षा ढेकीचाच जास्त वापर केला जातो कारण हयावर जास्त वेळ लागतो.

जतेमतीचे उपयोग :- हरक दळण्यासाठी

दगडाचे उपयोग :- पिट तयार करण्यासाठी, चुन तयार करण्यासाठी, दाळ तयार करण्यासाठी, हळद दळण्यासाठी, जाते विकत घ्यावे लागते. किंमत **Error! Bookmark not defined.** ३००/- रूपये

सुप, बिजनी सुप उपयोग :- 1) धान साफ करण्यासाठी 2)धान उडवण्यासाठी 3) तांदूळ साफ करण्यासाठी 4) दाळ तसेच इतर धान्य साफ करण्यासाठी

साधा सुप उपयोग :- बिजनी सुपा प्रमाणेच या सुपाचा वापर केला जातो.

फरक :- बिजनी	साधा
1) कन्या शिरत नाहीत	1) कन्या शिरतात
2) शेनांनी लिपत नाहीत	2) शेनाने लिपतात
3) धान उडवितांना सुप मारत	3) हवाकमी असतांना हवा जास्त धरतो.

गावाचे नाव :- झेंडेपार

अभ्यास गट :- 1) सुरेश पांडूरंग कल्लो
2) राजु सदाराम नैताम
3)राजकुमार कोडूराम होळी
4)कु.रेखा जुमेनसिंग होळी
5)कु. गिता महारू होळी

मार्गदर्शक :- श्री रामदास कल्लो

प्रकल्पाचे नाव :- दोरीचे विविध प्रकार

वेलीपासुन तयार होणा-या दो-या

1) येलवर्स - (पूजारवेंडा)

उपयोग :- तेंदूपानाचे पूडे बांधण्याकरिता

बनवण्याची पध्दत :- कापणे व साल अलग करून वाक काढणे व वापरणे. वापरल्यास अर्ध्या दिवस पाण्यात ठेवणे काढून वापरणे

कच्चा माल :- भर्रीत, जंगलात

टिकाऊपणा :- 1 महिने

2) बोदालवाक (चाहमुराळ)

उपयोग :- पूडे बांधणे, लाकडाचे मोरी बांधण्याकरिता,

बनवण्याची पध्दत :- कापणे व साल अलग करून हातानेच वाक काढणे.

कच्चा माल :- जंगलातून

टिकाऊपणा :- दीड महिने

प्रकल्पाचे नाव :- दोरीचे विविध प्रकार

गवतापासुन तयार होणा-या दो-या

1) बोरू

उपयोग :- बाज विणण्याकरिता, जनावरांना बांधण्याकरिता (कासरा, जोता, गेरवा,करधन), दो-या बनविणे, फांदा (जाळ), पिशवी, च-हाट,

बनविण्याची पध्दत :- बोरू कापून त्याला 5-8 दिवस पाण्यात भिजवून ठेवणे नंतर 1 दिवस उन्हात वाढविणे त्याची साल काढून हाताने साल गुंडाळतात ढेरा (दोरी गुंडायचे लाकडी साधन) च्या साहयाने दोरी तयार करणे.

कच्चा माल :- भर्री मध्ये बोरू ची लागवड करतात.

टिकाऊपणा :- 1 वर्ष

2) सुम (बगई)

उपयोग :- बाज, विणण्यासाठी, कासरा, वेसळी,

बनविण्याची पध्दत :- सुमला कच्चे कापणे व पाण्यात नरम करण्यासाठी 1 दिवस ठेवणे नंतर काढून त्याची वरची वाक काढून हाताने दोरी ऐटतात.

कच्चा माल :- शेतात, बांधीवर, नदी नाला इत्यादी

टिकाऊपणा :- दीड वर्ष

3) चिकटा

उपयोग :- बाज विणण्यासाठी, बैल-गाय बांधण्यासाठी (गरदोवा, वेसन, जोता, कासरा), च-हाट फास

बनविण्याची पध्दत :- कच्चे कापणे व पाण्यात 15 दिवस ठेवणे नंतर 1 दिवस उन्हात वाळविणे व त्यानंतर त्याची दोर तयार करणे.

कच्चा माल :- शेतात, वाडी, भर्री

टिकाऊपणा :- 6 महिने

4) मुवा

उपयोग :- बाज विणण्यासाठी, जनावरांना बांधण्यासाठी (गेरवा, वेसन, दावन)

बनविण्याची पध्दत :- कच्चे कापणे व 8 दिवस पाण्यात ठेवणे नंतर 1 दिवस वाढविणे त्याची साल काढून हाताने ऐटतात व ढेराने गुंडाळतात.

कच्चा माल :- जंगलातुन

टिकाऊपणा :- 7 महिने

5) केळती (करनकुवारी)

उपयोग :- च-हाट, कासरा, वेसन, जोता, गेरवा, दो-या विणण्यासाठी

बनविण्याची पध्दत :- कापणे व पुर्ण कुचलणे 11 दिवस पाण्यात ठेवणे काढून धुने त्याला उन्हात सुकवून हाताने ऐटनें नंतर ढे-यावर ऐटून दोर तयार करतात.

कच्चा माल :- शेतात, भर्री,

टिकाऊपणा :- 10 महिने

6) तनीस

उपयोग :- धानाचे भारे बांधध्यासाठी

बनविण्याची पध्दत :- तनीस पाण्यात भिजवून हाताने ऐटून दोर बपवितात.

कच्चा माल :- शेतात

टिकाऊपणा :- 1 वर्ष

वेलीपासून तयार होणा-या दो-या

1) माहूर (मोहलईन)

उपयोग :-बैलाना गाईना बांधण्यासाठी (जेठा, कासरा, जोता, वेसन, गरदवा) बंडीला बांधण्यासाठी

बनवण्याची पध्दत :- कच्चेच कापणे व डोक्याकडून साल काढणे व शेंडीकडून दोरी काढणे (सोपी जाते) दोर वाळवणे वाभ्ल्यावर नरम करण्याकरिता लाकडाने कुचरणे दोरीचे लहान तुकडे करावे व हाताने एंठ मारून ढेरात गुंडाळणे व दोरी तयार करणे.

कच्चा माल :- जंगलातुन

टिकाऊपणा :- 1 वर्ष

2) येंला (डिवेरवेली)

उपयोग :- घराचे छपपर बांधण्याकरिता. लाकडाची मोरी बांधण्याकरिता.

बनवण्याची पध्दत :- कच्चेच कापणे व वापर करणे वापरल्यास नरम करण्याकरता पाण्यात 1 दिवस ठेवणे व काढून वापरणे.

कच्चा माल :- भर्रीत, टेकडीत, नदीकाठी

टिकाऊपणा :- 1 वर्ष

गावाचे नाव :- पांढरीगोटा

अभ्यास गट :- 1) सुनित जगदिश हुंड्रा

2)जानोबाई चम्मा पोरेटी

3)कु.फुलकैना जमकातन

मार्गदर्शक :- श्री. मोतीलाल गांवडे

पारंपारीक चुलीचे प्रकार

घरगुती वापरायच्या चुली

1) एकमैया चुल :- या चुलीप्रासून त्रास होत. कारण या चुलीपासून धुर जास्त निघतो. या चुलीत जाळण्यासाठी इंधन कमी लागतो. चुलीमध्ये धुरांडे बसविले तर धुरांचे त्रास होणार नाही. चुली बनविण्यासाठी मततवत! ठववाठंता दवज कमपिदमकण दिवस लागतो. ही चुल तीन ठिकाणी उंच भाग आहे व गोलाकार आहे.

2) दुमैया चुल :-या चुलीपासून धुरांचे जास्त त्रास होत नाही. या चुलीत जाळण्यासाठी लागणारे इंधन जास्त लागतो. या चुलीमध्ये धुरांडे बसविले तर धुरांचे त्रास अजिबात होणार नाही दुमैया चुलीमध्ये दोन चुल असते. ऐक गोलाकार व तीलाच लागून अर्धाकार आहे. यात लवकर स्वयंपाक करता येतो.

3) शेगळी चुल :- ही चुल मातीची बनविली जाते. यात जाळण्यासाठी लागणारे इंधन अतिशय कमी प्रमाणात लागतो. यात निवे किंवा कोळसा भरतात. शेगळी चुलीपासून धुर निघत नाही. शेगळी चुलीपासून सावकाश स्वयंपाक तयार होतो.

4) सात मुही चुल:- सात मुही चुलीचा उपयोग लग्नाचा वेळी उपयोग करतात लग्नाचा वेळी चुलीचा बाजुला वर-वधुंचे चित्र काढतात. चुलीचे व वर - वधुंचे पुजा केल्याशिवाय चुलीमध्ये विस्तो(आग) लावत नाही. ही चुल मातीपासून तयार केली जाते. यात धुरांचे त्रास जास्त होतो. यात जाळण्यासाठी इंधन (लाकूड) जास्त लागतो. यापासून लवकर स्वयंपाक तयार होतो.

गावाचे नाव :- काळे

अभ्यास गट :-1) कु.सरिता कुमरे, वय १० वर्ष

2)कुमारसाय कुमरे, वय १२ वर्ष

3) जगतराम कुमरे, वय १० वर्ष

4)कु.सुखबत्ती कुमरे, वय १२ वर्ष

मार्गदर्शक :- श्री. सरादु कुमरे

प्रकल्पाचे नाव :- दातूनाचे प्रकार व त्याचे उपयोग

1) कळलिंबचे दातून

उपयोग :- कळलिंबचे दररोज दातन केल्याने दात दुखणे, दातामधील काळा डाग व दातामधील अनेक विकार दूर होऊ शकते. तसेच आजारी माणसोच्या तोंडातून दुरगंध वास येतो, तेव्हा कळलिंबाचे दातून करतात.

सुखलेल्या दातूनापासून फायदा :- सुखलेल्या दातूनमध्ये रस सुखलेला असते.त्यामुळे काही प्रमाणात फायदा होईल.

तोडले दातून किती दिवस पर्यंत पाण्यात सावलीत ठेवता येईल :-

कमीतकमी पाण्यात/सावलीच्या ठिकाणी 7 - 8 दिवस ठेवता येईल.

होणारे खर्च :- खर्च नाही.

2) कराजीचे दातून

उपयोग :- दातामधील काळा डाग निघतो, दात दुखणे व दातातील अनेक विकार दूर होतात. तसेच आजारी माणसाला जेवण होत नाही तोंड खटू वाटते तेव्हा करांजीचे दातून करतात.

फायदा :- सुखलेल्या दातूनापासून काही प्रमाणात फायदा होईल.

पाण्यात/सावलीच्या ठिकाणी 7-8 दिवस ठेवता येईल.

होणारे खर्च :- खर्च नाही.

3) गराळीचे दातून

उपयोग :- दररोज गराळीचे दातून केल्याने दात मजबूत होतात व दात दुखणे थांबते तसेच पोटातील विकार व गर्मी झालेल्या माणसाला फायदा होते पण दातून करतेवेळेस रस आतमध्ये गिळकावे लागते.

फायदा :- फार कमी प्रमाणात फायदा होईल. कारण की लवकर सुखतो.

5-6 दिवस पर्यंत पाण्यात / सावलीत ठेवता येईल.

होणारा खर्च :- खर्च नाही.

4) मांजाचे दातून

उपयोग :- मांजाचे दातून दररोज केल्याने दात मजबूत होतात. दात दुखणे थांगते.

फायदा :- काही प्रमाणात फायदा होते.

5-6 दिवस पर्यंत पाण्यात किंवा सावलीत ठेवता येईल.

होणारा खर्च :- खर्च नाही.

5) सेलवाटचे दातून

उपयोग :- आजारी माणसाला जेवण होत नाही. तोंड खटू वाटते पित-परम झालेल्या असते. पिसाव पिवळी जाते. अशा वेळी सेलवेटचे दातून करतात. आणि तोंडातून दुरगंध वास येतो तेव्हा वापरतात.

फायदे :- काही दिवसासांठी फायदेशीर आहे. जास्त दिवस असलेला दातून फायदेशीर नाही. 5-6 दिवस पाण्यात किंवा सावलीत ठेवता येईल. जास्त दिवस पाण्यात ठेवल्यास दातून काळे पडतात व वास येतो.

होणारा खर्च :- खर्च नाही.

6) ऊंबराचे दातून

उपयोग :- दात हालतात, दुखतात अशावेळेस ऊंबराचे दातून करतात तसेच आजारी माणसाला जेवन होत नाही त्यावेळेस ऊंबराचे दातून करतात. ( )

फायदे :- काही दिवस फायदेशीर आहे.

5-6 दिवस पाण्यात किंवा सावलीत ठेवता येईल.

होणारा खर्च :- खर्च नाही.

7) भेरा

उपयोग :- लहान मुल किंवा मोठया माणसाच्या पोटात जंतू झालेल्या असेल विष्ठा व्दारे बाहेर पडत असल्यास भेराचे दातून करून रस आतमध्ये गिठकावे लागते. असाच केल्याने जंतू मरतात.

फायदे :-सुखलेला दातून काही प्रमाणात फायदेशीर आहे.

7-8 दिवस पाण्यात किंवा सावलीत ठेवता येईल.

होणारा खर्च :- खर्च नाही.

8) रेते

उपयोग :- गर्मी झालेल्या माणसासाठी रेतेचे दातून फार उपयोगी आहे. दररोज दातून करतेवेळेस रस आतमध्ये गिठकावे लागते. असाच केल्याने काही दिवसात गर्मी कमी होईल.

फायदे :- सुखलेला दातून केल्याने काही प्रमाणात फायदा होईल.

7-8 दिवस पाण्यात किंवा सावलीच्या ठिकाणी ठेवता येईल.

होणारा खर्च :- खर्च नाही.

9) रक्तरोटळी

उपयोग :- रक्तरोटहीचे दातून केल्याने पोटातील विकार दूर होतात. पोट दुखत असतांना रक्तरोटळीचे दातून करतेवेळेस रस आत मध्ये गिठकावे लागते.

फायदे :- सुखलेला दातून केल्याने काही प्रमाणात फायदा होते. 7-8 दिवस पाण्य किंवा सावलीत ठेवता येईल. होणारा खर्च :- खर्च नाही.

10) दातून म्हणून उपयोगी येणारे प्रकार :-

येन, जांभूळ, भाभळी, कोल्हरी, चिकटा, चरोठा, बाँबु, सिहना, टेंभरून, मोठा, कसई, चिंचा, आंब्याचे वगैरे.

गाावाचे नाव :- साल्हे

अभ्यास गट :-

1) कन्हेश कोरचा वय 13 वर्ष
2) जितेश बोगा वय 9 वर्ष
3) माधुरी हिडामी वय 9 वर्ष
4) सुगनी नैताम वय 8 वर्ष
5) ललीता गोटा वय 7 वर्ष

मार्गदर्शक :- श्री. इजामसाय कार्टेगे
रा. साल्हे

प्रकल्पाचे नाव :- धानाच्या जाती

मौजा :- सोहले

हल्की लुचई देशी धान

एकरी उत्पन्न :- साधारण हल्की लुचई हा धान एकरी तीन ते साडेतीन खंडया उत्पन्न होतो.

पाणी :- या धानाला पाणी जास्त लागत नाही कारण हा धान हलका आहे.

खत :-

शेण खत :-या धानामध्ये दोन ते अडीच पेटया शेण खत टाकतात.

रासायनिक खत :- या धानामध्ये कमीत कमी 15 ते 20 किलो रासायनिक खत टाकतात.

तांदूळ :- या धानाचे तांदूळ बारीक येतात. ते खाण्यासाठी परवडणारे आहेत.

विकण्यासाठी :- हा धान विकण्यासाठी परवडत नाही. कारण हा धान हलका आहे.

पोहा :- या धानापासून पोहा तयार होत नाही. कारण हा धान बारीक आहे.

रोग :- या धानाला किळ लागत नाही.

सुवर्णा सरकारी

एकरी उत्पन्न :- साधारन एकरी उत्पन्न चार ते साडेचार खंडया इतका होतो.

पाणी :- या धानाला जास्त पाणी लागतो कारण हा धान भारी आहे.

शेणखत :- या धानामध्ये एक ते दीड पेटी शेण खत टाकतात.

रासायनिक खत :- या धानामध्ये 50 किलो रासायनिक खत टाकतात.

तांदूळ :- या धानाचे तांदूळ चांगले येतात. आणि खाण्यासाठी चांगले आहेत.

